जा क मसके/प्रअपां/ जेसीबी /495/ 3564 /2022
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक : 08.12.2022 - 9 DEC 2022

प्रति,

______________________
______________________
______________________

विषय : पांगारी विभागाअंतर्गत भाडे तत्वावर जेसीबी पुरवठयाचे दरपत्रक पुरविण्याबाबत....

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत असलेल्या पांगारी या विभागास खाली नमूद केलेली कामे करण्यासाठी भाडे तत्वावर जेसीबी वापरावयाचा आहे. तरी या बाबतचे आपले माहोरबंद लखोटयातील दरपत्रक या कार्यालयास पाठविणेत यावे. खरावयाच्या कामांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | तपशिल<br>कालावधी ०१.०१.२०२३ ते ३०.०१.२०२३ |
|---|---|
| १) | आंबा लागवडीतील अनावश्यक जंगली झाडांचे बुंधे, ग्लिरिसीडीया झाडांचे बुंधे, काटेरी झुडपांचे बुंधे मुळासकट काढणे व एकत्र ढिग रचून टेवणे. |
| २) | आंबा झाडांच्या विस्तारापासून थोडया अंतरावर २ फुट खोल व २ फुट रुंदीचे उतार पाहून कंपोस्टखत निर्मितीसाठी चर खोदणे. |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील दैनंदीन कामे टेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती दिन (कामाचे दहा तास गृहीत धरून) अथवा प्रती तास दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक 23.12.2022 पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाटवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत जेसीबी कंत्राटी कामे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जवाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या टेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

8/12/2022

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.